# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यात धरण क्षेत्रातीलच गावे जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडण्यात आल्याबाबत

**(१) ८८६०४ (११-०८-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यात धरण क्षेत्रातीलच गावे जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडण्यात आली असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय;

(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे आणि धरण क्षेत्रातील गावे जलयुक्त शिवार योजनेतून वगळून राजापूर तालुक्यातील अपूर्ण धरणांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणते नियोजन करण्यात आले वा येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. राम शिंदे (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राजापूर तालुक्यामध्ये १० लघु पाटबंधारे योजनांची कामे असून यापैकी ०२ कामे पूर्ण व ०७ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ०१ योजनेच्या निविदेची कार्यवाही सुरू आहे.

---

### कोकणसाठी (जि.रत्नागिरी) जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करण्याबाबत

**(२) ९५३२५ (२६-१२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंधारण कामांसाठी लागू करण्यात आलेल्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार कोकण (जि.रत्नागिरी) विभागामध्ये जलसंधारणाची कामे होण्यासाठी निकष, अटी, शर्तीचा अडथळा होत असल्याने कोकणची भौगोलिक परिस्थिती पाहता जलसंधारण कामांचे स्वतंत्र निकष तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती आणि त्याअनुषंगाने स्वतंत्र निकष तयार करण्याचे आदेश मा.जलसंधारण मंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास कोकण विभागातील जमिनीची पत अन्य विभागाच्या तुलनेत वेगळी असून याठिकाणी जमिनीत पाणी मुरत नसल्याने या विभागासाठी जलसंधारण योजनेचे स्वतंत्र निकष तयार करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत मा.जलसंधारण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मंत्रालय, मुंबई  येथे झालेल्या बैठकीमध्ये कोकण विभागासाठी स्वतंत्र निकष तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०५-२०१८) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

(४) सिमेंट नाला बांधाचे मापदंड शासन निर्णय दिनांक २३ जून २०१७ अन्वये निर्गमित करण्यात आले होते त्यामध्ये शासन पत्र दि.२३/३/२०१८ नूसार जलयुक्त शिवार अभियानातील गावांकरिता आर्थिक मापदंड सुधारित करण्यात आले आहेत. तसेच प्रधान सचिव (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली मापदंड निश्चित करण्याकरीता स्थापन केलेल्या समितीकडे कोकण विभागाकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील अंगणवाडयांना जागा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी व अंगणवाडी सेविकांची होत असलेली गैरसोय**

**(३) ९५६२५ (२६-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात ९९ अंगणवाडयांना स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध नसल्यामुळे खाजगी इमारती, प्राथमिक शाळा, समाजमंदीर व अंगणवाडी सेवकांच्या घरात भरविल्या जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वत:च्या मालकीची जागा नसल्यामुळे अंगणवाडी भरविण्यासाठी वारंवार बदलणाऱ्या जागेमुळे अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणवाडी बांधण्यासाठी २ गुंठे जागेची आवश्यकता असून बहुतांशी गावातील मोकळया जागा सिडको किंवा वन विभागाच्या असल्यामुळे ग्रामपंचायतीना अंगणवाडीसाठी जागा उपलब्ध करून देणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त शासनाने चौकशी करून अंगणवाडींना स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध करून देण्याबाबत तातडीची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनाअंतर्गत पनवेल १ व पनवेल २ अशी दोन प्रकल्प असून एकूण ३६४ अंगणवाडया असून त्यापैकी २३७ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती आहेत व स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाडयांची संख्या १२५ इतकी आहे.
(२) ज्या ठिकाणी अंगणवाडीसाठी स्वत:ची इमारत नाही अशा अंगणवाडया समाजमंदिर, प्राथमिक शाळा, वर्ग खोल्या तसेच अंगणवाडी सेविका यांचे घरात भरविल्या जातात. अंगणवाडी केंद्र इतरत्र जरी स्थलांतरीत केले तरी त्याच क्षेत्रात असते. सेविका / मदतनीस त्याच क्षेत्रात राहतात त्यामुळे त्यांना कोणतीही अडचण निर्माण होत नाही.
(३) शासनाने ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे पनवेल तालुक्यातील शहरी भागातील जमिनी या सिडको यांचे ताब्यात असून सदर जमिनी अंगणवाडयासाठी प्राप्त करुन घेणेसाठी सिडको यांच्याकडे बाजारमुल्याप्रमाणे जमीन खरेदी करणे आवश्यक आहे. अंगणवाडी केंद्रासाठी भुखंड खरेदी करण्याचे योजनेत प्रावधान नाही. तथापि अंगणवाडी बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्याकरीता ग्रामपंचायतींना वेळोवेळी विनंती करण्यात आलेली आहे.
(४) ज्या ठिकाणी अंगणवाडी केंद्रांना स्वत:च्या इमारती नाही तेथील ग्रामपंचायतींना अंगणवाडी केंद्र बांधण्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीत रिकाम्या वर्ग खोल्यामध्ये अंगणवाडी केंद्र स्थानांतरीत करणेबाबत संबंधितांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार रायगड जिल्हयात ७० अंगणवाडी केंद्र शालेय वर्गात स्थानांतरीत करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.देशमाने बु. (ता.येवला, जि.नाशिक) येथील अंगणवाडीचा दरवाजा अंगावर पडून दोन बालके जखमी झाल्याबाबत**

**(४) ९५७६० (२६-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. देशमाने बु. (ता.येवला, जि.नाशिक) येथील अंगणवाडीचा दरवाजा अंगावर पडून दोन बालके जखमी झाल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची तसेच भविष्यात जिल्हाभरात अशा दुर्घटना होवू नये यासाठी उपाययोजना करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनास सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

मौजे देशमाने बु. येथील अंगणवाडी केंद्राचा दरवाजा चौकट सह किडयांनी पोखरुन पोकळ झालेला दरवाजा अंगणवाडी सेविका यांनी स्थानिक रहिवाशांच्या मदतीने दिनांक २९/०८/२०१७ रोजी बाजूला काढून ठेवलेला होता. सदर दरवाजा दिनांक ३०/०८/२०१७ रोजी अंगणवाडीतील मुले खेळत असतांना मुलांच्या धक्क्याने फरशी वरुन घसरुन पडला असता मुलांना दरवाजाच्या धक्क्याने किरकोळ स्वरुपात दुखापत झाली होती.

(२) हे खरे आहे.

दिनांक ०६/०९/२०१७ रोजी सभापती, महिला व बाल कल्याण समिती, जिल्हा परिषद, नाशिक तसेच स्थानिक सरपंच व सदस्य आणि महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक व गट विकास अधिकारी, पंचायत समिती येवला यांनी समक्ष देशमाने गावास संयुक्तिक भेट देऊन अशा दुर्घटना भविष्यात होऊ नये यासाठी वेळीच उपाययोजना करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

(३) ग्रामपंचायतीने याबाबत वेळीच दखल घेऊन दिनांक ०२/०९/२०१७ रोजी नविन दरवाजा बसवून दिलेला असून परिसर देखील स्वच्छ करुन दिलेला आहे. अंगणवाडी दुरुस्तीबाबत यापूर्वी कोणतेही प्रावधान नव्हते. परंतु आत शासन निर्णय क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०१/का.०६, दिनांक १५ डिसेंबर, २०१७ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधीमधून अंगणवाडी दुरुस्तीकरीता प्रावधान करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यामध्ये अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देणेबाबत**

**(५) ९५७६३ (२६-१२-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यामध्ये सूक्ष्म सर्वेक्षण करून नवीन व नियमित अंगणवाडी केद्रांसाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी दिलेल्या

निदेशानुसार नाशिक जिल्हा परिषदेने दिनांक २१ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केलेले प्रस्ताव माहे आक्टोंबर २०१७ पर्यंत प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सर्व उपमुख्य कार्यकारी जिल्हा परिषदांकडून सूक्ष्म सर्वेक्षण करुन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नवीन व नियमित अंगणवाडी केंद्रासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सर्व जिल्हा परिषद तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प यांचेकडून अतिरिक्त अंगणवाडीसाठी प्रस्ताव या आयुक्तालयात प्राप्त झाले होते.

(२) अतिरिक्त अंगणवाडीसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव आयुक्तालयाचे पत्र क्र.ICDS/D-४/१५-१६/७१५, दिनांक २/०३/२०१६ अन्वये केंद्र शासनाची मंजूरी मिळणेसाठी महिला व बाल विकास विभाग, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आलेले आहेत.

(३) या बाबत केंद्र शासनाचे निर्देशानुसार नवीन / अतिरिक्त अंगणवाडी केंद्रांस मंजूरी देण्यापूर्वी सद्य:स्थितीत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची आवश्यकतेप्रमाणे पुनर्रचना करण्यात यावी असे सूचित केले आहे. त्याप्रमाणे आयुक्तालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/ का-४/२०१७/३००८ दिनांक २२/०९/२०१७ अन्वये अंगणवाडी केंद्रांची लाभार्थी संख्येप्रमाणे पुनर्रचना / स्थानांतरण करणेबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्या कारणाने अतिरिक्त अंगणवाडी केंद्रांस केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नसल्याकारणाने विलंब होत आहे.

---

## येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रातील बालगुन्हेगार पळून गेल्याबाबत

**(६) ९६५७२ (२६-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्राचा दिनांक १६ जून, २०१७ रोजी दरवाजा तोडून पळून गेलेल्या ८ बालगुन्हेगारांना अद्यापी पकडण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी दिनांक १७ जून, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्यावेळी त्यांना कोणकोणत्या त्रुटी निदर्शनास आल्या आहे,

(३) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी काय उपाययोजना करण्यांत आल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कर्तव्यावर कार्यरत असलेल्या तीन काळजी वाहकांकडून मागविलेला खुलासा प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यानुसार त्यांच्याविरुध्द काय कारवाई करण्यांत आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्रातील पळालेल्या ०८ विधी संघर्षीत बालकांपैकी ०५ बालके पोलीसांनी संस्थेत दाखल केली असुन, ०३ बालकाचा शोध अद्याप सुरु आहे.

(२) जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिनांक १७ जुन, २०१७ रोजी दिलेल्या भेटीच्यावेळी त्यांना पुढील त्रुटी आढळून आल्याचे नमूद केले आहे.

१. सीमाभिंतीला जुन्या खिडक्या असणे.

२. तत्कालीन वेळी झालेल्या मुसळधार पाऊसामुळे खंडित झालेला विद्यूत पुरवठा.

३. निरिक्षणगृहातील बालकांची संस्थेत बंदिस्त न राहण्याची मानसिकता.

(३) यापुढे अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१. संस्था परिसरात सी. सी. टि. व्ही. बसविले आहेत.

२. संस्थेतील संभाव्य पळवाटा पत्रे ठोकून तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेल्या आहेत.

३. संस्थेतील इतरत्र कामकाज व्यवस्थेवरील काळजीवाहक परत संस्थेत बोलावण्यात आले आहेत.

४. निवासस्थानातील दरवाज्याच्या दुरुस्त्या करणेत आलेल्या आहेत.

५. खाजगी सुरक्षा रक्षक नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे.

६. सार्वजनिक बांधकाम विभागास सीमाभिंती दुरुस्ती व ऊंच करणेबाबत पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.

७. संस्था परिसरात पोलीस चौकी ऊभारण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

(४) होय.

सदर कर्मचा-यांनी खुलाशामध्ये नमूद केलेली कारणे समर्पक असल्याने, अशी घटना परत घडू नये याबाबत त्यांना समज देण्यात आली आहे.

---

### माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे साठवण तलावाचे काम करण्याबाबत

**(७) ९६७७९ (२६-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे साठवण तलावाचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०३-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. मा.विधानसभा सदस्य यांनी त्यांच्या दि.१३/८/२०१७ च्या निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता, लातूर लघु पाटबंधारे विभाग, लातूर (जलसंपदा विभाग) यांना सुचना केल्या आहेत.

(२) प्रस्तावित प्रकल्पाचा पाणी उपलब्धता प्रस्ताव मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांना दि.३१/१२/२०१३ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. तथापि सदर प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसाठी परत करण्यात आला होता.

मध्य गोदावरी जल आराखडा (१८.३३ टीएमसी) यास जलसंपदा विभागाचे दि.३/४/२०१३ चे पत्रान्वये २६९ प्रकल्पांना अटींच्या अधीन १८.३३ अ.घ.फु. पाणी उपलब्ध करुन देण्यात आले होते. या २६९ प्रकल्पात माकेगाव साठवण तलाव, ता.रेणापूर, जि.लातूर (साठवण क्षमता १.५० दलघमी व २२५ हेक्टर) ह्या प्रकल्पाचा समावेश होता. तथापि अटींची पुर्तता न झाल्याने मध्य गोदावरी आराखड्यातील (१८.३३ अ.घ.फु.) जलसंधारण विभागाकडील २१८ पैकी कोणत्याही प्रस्तावित प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होऊ शकले नाही.

सद्यस्थितीत गोदावरी खोरे एकात्मिक राज्य जलविकास आराखडा मंजूर करण्यात आला असून त्यानुसार मध्य गोदावरी उपखो-यात नवीन प्रकल्पांसाठी २४.४२ अ.घ.फु. पाणी उपलब्ध आहे. त्यानुसार माकेगाव साठवण तलाव, ता.रेणापूर, जि.लातूर या प्रकल्पास पाणी उपलब्धतेस अनुसरुन पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण हाती घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात प्रधानमंत्री "बेटी बचाओ बेटी पढाओ" या योजनेंतर्गत विद्यार्थी मुलींची होत असलेली फसवणूक

**(८) ९६७८० (२६-१२-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात प्रधानमंत्री "बेटी बचाओ बेटी पढाओ" या योजनेंतर्गत विद्यार्थी मुलींना २ लाख रुपये मिळत असल्याचे दर्शवून दलाल त्यांच्याकडून अर्ज भरुन त्यांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील शालेय मुलींची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांवर कारवाई करण्यासोबतच ही फसवणूक रोखण्यासाठी शाळा-महाविद्यालयातून याबाबत जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय.

सदर प्रकरणी महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) अशी तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु, अशा प्रकारच्या अफवांपासून सावध राहावे, बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी कोणतेही अर्ज शासनाने मागविलेले नाहीत असा खुलासा सदर स्थानिक वृत्तपत्रांमध्ये देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील अंगणवाडया इमारतीविना खाजगी ठिकाणे, समाजमंदिर येथे भरत असल्याबाबत

**(९) ९७४५९ (२६-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ४,८०१ अंगणवाडयापैकी १,०७० अंगणवाडया इमारतीविना खाजगी ठिकाणे, समाजमंदिर येथे भरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंगणवाडयांना तातडीने इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेच्या शाळामध्ये ज्या ठिकाणी रिकाम्या वर्ग खोल्या आहेत, तेथे शालेय विभागाशी संपर्क साधून अशा रिकाम्या वर्ग खोल्यांमध्ये अंगणवाडी केंद्र स्थानांतरीत करण्याच्या सूचना सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेल्या आहेत. अहमदनर जिल्हयात ३६ अंगणवाडी केंद्र शालेय वर्गात स्थानांतरीत करण्यात आलेले आहेत, तसेच महिला व बाल विकास विभाग, यांचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या

शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून जिल्हा नियोजन व विकास मंडळ अंतर्गत नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देणेत आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निराधार, विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहास अनुदान योजना बंद करण्यात येत असल्याबाबत

**(१०) ९७४८४ (२६-१२-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निराधार, विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहास आर्थिक हातभार लावण्यासाठी शासनाने सुरु केलेले अनुदान योजना बंद करण्यात येत असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ आतापर्यंत किती महिलांनी घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर योजना बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर योजनेचा प्रसार/प्रसिध्दी करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) नाही.

निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान योजनेचा समावेश दि.३०.०९.२०११ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेल्या शुभमंगल सामुहिक/ नोंदणीकृत विवाह योजनेत करण्यात आला असून, सदर योजना सुधारित स्वरुपात जिल्हा नियोजन समितीमार्फत संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.

(२), (३) व (४) सदर योजनेचा लाभ आतापर्यंत ६०८ निराधार/परित्यक्ता/विधवा महिलांनी घेतला आहे.

सदर योजनेचा समावेश शुभमंगल सामुहिक विवाह योजनेची व्याप्ती वाढवून सदर योजनेत समाविष्ठ केली आहे.

सदर योजनेंसदर्भातील माहिती पत्रके, रेडिओ झिंगल्स, माहिती पुस्तिका याव्दारे तसेच वेळोवेळी आयोजित करण्यात आलेले महिला मेळावे, महिलांचे कार्यक्रम, जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम व जिल्हास्तरावर घेण्यात येणारे प्रचार प्रसिध्दीचे मेळाव्यांच्या माध्यमातून सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील अंगणवाडी इमारतीचे कामे प्रलंबित असल्याबाबत

**(११) ९७९५४ (२६-१२-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्यावतीने सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमधून सन २०१७-१८ मध्ये पुणे जिल्हयात अंगणवाडी इमारत बांधकाम योजनेसाठीचा निधी वितरीत न करण्याच्या सूचना पत्राद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या जिल्हयातील अंगणवाडी इमारतींची कामे पूर्ण होणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन जिल्हयातील अंगणवाडी इमारतींची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभाग दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-२०१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडी इमारत किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच अंगणवाडीमध्ये शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधीचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

(३) महिला व बाल विकास विभागाचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-२०१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीसाठी तसेच ज्या अंगणवाडीमध्ये शौचालये नाहीत तेथे शौचालय बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधीचा विनियोग करण्याबाबतचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अंगणवाड्यांच्या दुरूस्तीसाठी लेखा शिर्ष उपलब्ध नसल्याने विविध जिल्हयातील अंगणवाडयांची दुरुस्ती होत नसल्याबाबत

**(१२) ९९१०५ (२६-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन १९७५ पासून उभारण्यात आलेल्या अंगणवाड्यांच्या दुरूस्तीसाठी लेखा शिर्ष उपलब्ध नसल्याने विविध जिल्हयातील अंगणवाड्यांची अवस्था दुरूस्ती अभावी दयनीय झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मोडकळीस आलेल्या अंगणवाडी इमारतीमध्ये बालके जीव धोक्यात घालून मुळाक्षरे गिरवीत आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, वर्षानुवर्षे जीर्ण अवस्थेत असलेल्या आणि मोडकळीस आलेल्या अंगणवाड्या दुरूस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी राज्य विकास परिषदेत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जिल्हयातील ज्या ठिकाणी धोकादायक मोडकळीस आलेल्या अंगणवाडी इमारती आहेत, अशा प्रकारची अंगणवाडी केंद्र जिल्हा परिषद शाळेच्या रिकाम्या वर्ग खोल्या, समाजमंदिर, ग्रामपंचायत इमारत अथवा इतर ठिकाणी चालविण्यात येतात व तेथे बालकांच्या बसण्याची पर्यायी व्यवस्था आवश्यकतेप्रमाणे करण्यात येत आहे.
(३) महिला व बाल विकास विभाग यांचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देणेत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केकतपूर (ता.जि.अमरावती) येथील पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी निधी देणेबाबत**

**(१३) ९९५२८ (२६-१२-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केकतपूर (ता.जि.अमरावती) येथील पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी पर्यटन विकास अंतर्गत १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २९ जुलै,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार केकतपूर येथील पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२७-०६-२०१८) :** (१) होय. दि.२८/७/२०१७ रोजी निवेदन दिले आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार पर्यटन स्थळी पर्यटकांसाठी सोयी सुविधाविषयक कामांकरिता निधी मंजूर करण्यात येतो.

---

## सोलापूर जिल्हयातील अंगणवाड्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१४) ९९९६६ (२६-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील ७४० अंगणवाड्या यांना स्वतंत्र इमारत किंवा वर्ग खोली नसल्यामुळे अंगणवाडी शाळा उघड्यावर भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या अंगणवाडी मधील बालकांना इमारत नसल्यामुळे तसेच विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार देखील स्वतंत्र इमारती अभावी मिळणे अशक्य होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सोलापूर जिल्हयातील ७४० अंगणवाडी इमारती जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रशासनाने अदयाप कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०६-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयात एकूण ३२६९ अंगणवाडी मंजूर आहेत. त्यापैकी २५६५ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती उपलब्ध आहेत. उर्वरित ७०४ अंगणवाडयांपैकी ५६ अंगणवाडी केंद्रांची इमारत बांधकाम सुरु असून ६४८ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती उपलब्ध नाहीत. ६४८ स्वतंत्र इमारत किंवा खोली उपलब्ध नसणारी अंगणवाडी केंद्र हे प्राथमिक शाळा खोली, समाजमंदिर, ग्रामपंचायत इमारत, खाजगी जागा व इतर अन्य ठिकाणी भरविण्यात येत असून एकही अंगणवाडी केंद्र उघडयावर भरविले जात नाही.

(२) हे खरे नाही.

सोलापूर जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्र स्वतंत्र इमारत अथवा पर्यायी व्यवस्था केलेल्या इमारतीमध्ये (प्राथमिक शाळा वर्ग खोली, ग्रामपंचायत इमारत, समाजमंदिर, खाजगी जागा व अन्य ठिकाणी) भरविण्यात येत असून बालकांना पोषण आहार निकषानुसार देण्यात येत आहे.

(३) सोलापूर जिल्हयातील ज्या अंगणवाडयांना स्वतंत्र इमारत उपलब्ध नाही त्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे १५१ अंगणवाडयांना बांधकामासाठी जागा उपलब्ध झाली आहे. तसेच जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीतील खोल्यांमध्ये ३६ अंगणवाडी केंद्र स्थलांतरीत करण्यात आलेली आहेत.

महिला व बाल विकास विभाग यांचे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सन २०१७-१८ पासून जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडयासाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली (जि.परभणी) तालुक्यातील अंगणवाडी सेविकीने केलेली आत्महत्या**

**(१५) १००२६० (२६-१२-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि. परभणी) तालुक्यातील महिला बालकल्याण विभागांतर्गत अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असणाऱ्या श्रीमती सुमित्रा राखुंडे या महिलेने आत्महत्या केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत महिलेला मागील पाच महिन्यापासूनचा वेतन न मिळाल्यामुळे तसेच सन २००८ च्या रेकॉर्ड तपासणीच्या कामाच्या ताणामुळे आत्महत्या करीत असल्याचे तिने मृत्युपुर्व चिठ्ठीत लिहून ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर आत्महत्येच्या प्रकरणी सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी अंगणवाडी कर्मचारी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय

(५) असल्यास, चौकशीनुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन देणे, त्यांच्या कामाचा ताण कमी करणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन बोरी, ता.जिंतूर यांचे पत्र क्र.१४१७, दिनांक १८/११/२०१७ नुसार मयत सुमित्रा राखुंडे यांच्या राहत्या घरी संबंधितांने मृत्यूपूर्वी लिहिलेली चिठ्ठी पोलीसांनी ताब्यात घेतली आहे. सदर चिठ्ठीमध्ये संबंधितांना सन २००८ पासूनचे रजिस्टर कोठून द्यायचे, माहे जून, २०१७ पासून मानधन मिळाले नाही, लेक काही पैसे देत नाही, तसेच सुना जावा बरोबर नीट रहात नाहीत म्हणून मी दु:खी आहे. माझे आईवडिलांना फार दु:ख होईल असून नमूद आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद, परभणी यांनी चौकशी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सी.आर.पी.सी. कलम १७४ अंतर्गत अनैसर्गिक मृत्यू म्हणून पोलीस स्टेशन बोरी, ता.जिंतूर येथे नोंद करण्यात आलेली आहे.

(५) अंगणवाडी कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन देणेकरीता PFMS प्रणालीद्वारे नोंदणी करुन माहे ऑक्टोंबर, २०१७ चे मानधन संबंधिताच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेले असून ज्यांची PFMS प्रणालीमध्ये नोंदणी काही तांत्रिक अडचणीमुळे होऊ न शकल्यामुळे त्यांचे मानधन जुन्या पध्दतीने अदा करण्यास शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे आदेश दिनांक २०/११/२०१७ मधील तरतूदीनुसार PFMS प्रणालीमध्ये नोंद न झालेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे माहे जून, २०१७ पासूनचे मानधन प्रकल्पस्तरावर अदा करणेसाठी तरतूद वितरीत करण्यात आली आहे. आयुक्तालयाचे आदेश दिनांक २९/०९/२०१७ अन्वये संबंधित अंगणवाडी सेविकेना प्रति अंगणवाडी देय परिवर्तनीय निधी रुपये १०००/- रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

---

**मौजे कवठा केज (ता.औसा, जि.लातूर) येथील नालाखोलीकरण व सरळीकरण करण्याच्या कामाचा निधी समर्पित केल्याबाबत**

**(१६) १०२६९३ (२६-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कवठा केज (ता.औसा, जि.लातूर) येथील लातूर जिल्ह्यातील स्थानिक विकास निधी अंतर्गत मंजूर असलेल्या नालाखोलीकरण व सरळीकरण या कामाचा निधी कार्यकारी अभियंता जलसंधारण (लघु सिंचन) विभाग, लातूर यांनी काम पूर्ण झाले असतानाही समर्पित करून शासनाच्या फसवणूकीची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व संबधित दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) यासंदर्भात संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. त्यामध्ये तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांनी सदर देयकाची तांत्रिक तपासणी करून टिपण नोंदवहीसह विभागीय कार्यालयातील लेखा शाखेस मंजूरीस्तव दिल्याबाबत खुलासा सादर केला आहे. तसेच लेखा शाखेच्या खुलाशात प्रस्तुत देयक तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी हातोहात लेखाशाखेत दिल्याचे व तो दिवस आर्थिक वर्षाचा अखेरचा दिवस असल्याने व त्याच दिवशी लेखाशाखेतील कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने व इतर बिल तपासण्याची घाई असल्यामुळे या देयकाची मंजुरी वेळेवर म्हणजेच अंतिम दिवसाच्या अंतिम क्षणापर्यंत होवू शकली नाही असे नमुद केले आहे. संबंधिताचे खुलाशावरुन असे निदर्शनास येते की, दि. ३१/०३/२०१७ या दिवशी संबंधित कर्मचारी सेवा निवृत्त होत असल्याने या वर्ष अखेरीस कामाची घाई असल्याने अनावधानाने चुक झालेली आहे, म्हणुन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) लातुर यांनी समक्ष बोलावुन सक्त ताकिद दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी सेविकांचे थकीत वेतन व मानधनात वाढ करण्याबाबत**

**(१७) १०३७६६ (२६-१२-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविकांना ऑनलाईन वेतन सुरु करण्यात आले असले तरी या कर्मचा-यांच्या बँक खात्यात माहे जून महिन्यापासून वेतन जमा झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना आश्वासन देऊनही मानधनवाढ देण्यात आले नसल्यामुळे त्यांनी राज्यव्यापी संप केला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर कर्मचा-यांचे थकीत वेतन व मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे माहे जून, २०१७ ते डिसेंबर, २०१७ पर्यंतची PFMS प्रणालीद्वारे मानधन अदायगी करणेत आली आहे.

सदर मानधन अदायगी करणेकरीता सेविका/मदतनीस यांची PFMS प्रणालीमध्ये आधार संलग्न बँक खाते आधारित नोंदणी होणे आवश्यक आहे. राज्यात सुमारे दोन लाख सेविका/ मदतनीस कार्यरत असून १,९९,०८५ अंगणवाडी कर्मचारी यांची PFMS प्रणालीमध्ये नोंदणी झालेली आहे. परंतु केवळ २ ते ३ टक्के सेविका/मदतनीस यांचे अधारकार्ड अवैध (Invalid) असणे, आधारकार्ड बँक खात्याशी संलग्न (Seeding) नसणे, आधारकार्ड क्रमांक चुकीचा भरला गेल्यामुळे सदर सेविका/मदतनीस यांची PFMS प्रणालीमध्ये नोंदणी होऊ शकली नाही. याकरीता सदर सेविका/मदतनीस यांचे PFMS प्रणालीद्वारे मानधन अदा करण्यात आलेले नाही. ज्या अंगणवाडी सेविका/मदतनीस यांचे माहे जून, २०१७ पासून PFMS प्रणालीद्वारे मानधन अदा झालेले नाही त्यांचे मानधन प्रकल्पस्तरावरुन अदा करणेकरिता शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक तरतूद प्रकल्पस्तरावर वितरीत करणेत आलेली आहे. सद्य:स्थितीत सर्व सेविका व मदतनीस यांचे मानधन अदा करणेत आलेले आहे.
(२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मानधनात वाढ म्हणून अंगणवाडी सेविका यांना रु.१५००/-, मिनी अंगणवाडी सेविका रु.१२५०/- व मदतनीस रु.१०००/- प्रमाणे वाढ करणेबाबत घोषणा केली आहे, याबाबतचा शासन निर्णय आदेश निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) ज्या अंगणवाडी सेविका / मदतनीस यांचे माहे जून, २०१७ पासून PFMS प्रणालीद्वारे मानधन अदा झालेले नाही त्यांचे मानधन प्रकल्पस्तरावरुन अदा करणेकरिता शासन निर्णय दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक तरतूद प्रकल्पस्तरावर वितरीत करणेत आलेली आहे. सद्य:स्थितीत सर्व सेविका व मदतनीस यांचे मानधन अदा करणेत आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या करार तत्वावरील न्याय मागण्या निकाली काढण्याबाबत**

**(१८) १०३८७५ (२६-१२-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या करार तत्वावरील न्याय मागण्या निकाली काढण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१७ च्या दुस-या आठवड्यात लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सन १९९५ पासून कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी १० टक्के मानधन वाढविणे दिनांक ५ फेब्रुवारी, २००७ च्या शासन निर्णयानुसार अपेक्षित असतानाही देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) होय.

(२), (३) व (४) तेजस्विनी कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांना शासन निर्णय क्र.माविम-२००२/प्र.क्र.१०६/का-१०, दि.५.२.२००७ नुसार महामंडळाने सन २००८-०९, २००९-१० व २०१०-११ पर्यंत एकत्रित मानधनावर अनुक्रमे १०% वाढ दिली होती. त्यानंतर महामंडळातील नियमित सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांना सन २००८ मध्ये पाचवा वेतन आयोग लागू केल्यामुळे त्यांना मिळणारे वेतन व करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांना मिळणारे मानधन यांच्यात जवळ-जवळ ७५% ते १००% इतकी तफावत दिसून आल्यामुळे ही तफावत कमी करण्यासाठी महामंडळाने जुलै, २०१० मध्ये करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या एकत्रित मानधनात ५०% वाढ करुन मानधनाची रक्कम व नियमित सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन यांच्यामधील ५०% तफावत कमी करण्याचा प्रयत्न केला व सोबतच १०% वाढ देणे सुरु ठेवले.

सन २०१२ मध्ये नियमित सेवेतील अधिकरी/ कर्मचारी यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यामुळे त्यांना मिळणारे वेतन व करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांना मिळणारे मानधन यामध्ये पुन्हा ७५% पर्यंत तफावत दिसू लागली. तेजस्विनी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये नियमित अधिकारी/ कर्मचारी यांचेसोबत करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांची भूमिका महत्वाची असल्यामुळे नियमित व करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व मानधनामधील तफावत कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अडचणीची होवू लागली होती. ही बाब लक्षात घेवून दि.४.९.२०१२ रोजीच्या तेजस्विनी राज्यस्तरीय शक्तीप्रदान समितीच्या बैठकीत तेजस्विनी कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांच्या मानधनामध्ये जानेवारी, २०१२ पासून ४०% वाढ करुन यापुढील प्रकल्प कालावधीपर्यंत मानधनात वार्षिक ३% वाढ करण्यास अंदाजपत्रकीय उपलब्ध तरतूदीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार करारतत्वावरील अधिकारी/ कर्मचारी यांना मानधनात आजपर्यंत दरवर्षी ३% वाढ देण्यात येत आहे.

---

**पालघर मधील एका खाजगी इन्स्टिट्यूटने मेडिकलच्या विद्यार्थ्यांकडून केलेली नियमबाह्य शुल्क आकारणी**

**(१९) १०४७७१ (०७-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर मधील एका खाजगी इन्स्टिट्यूटने मेडिकलच्या विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य जास्तीचे शुल्क आकारल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शुल्क नियमन प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमांचा इन्स्टिट्यूटकडून उल्लंघन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित खाजगी इन्स्टिट्यूटवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच, संबंधित इन्स्टिट्यूटची मान्यता रद्द करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही. कंपनीद्वारे स्थापन वैद्यकीय महाविद्यालय हे नफा कमविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले असल्याने तेथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संवर्गातील विद्यार्थी प्रवेशांना अभिमत विद्यापीठासाठी लागू असलेल्या शुल्काच्या अटी लागू राहतील असे संबंधित शासन निर्णयात नमूद केलेले आहे.

(२) शुल्क नियामक प्राधिकरण यांनी अंतरिम शुल्क रुपये ६ लाख निश्चित केले होते. तथापि संबंधित महाविद्यालय हे कंपनी कायदयांतर्गत स्थापन झालेले असल्याने तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या विनियमनानुसार अशा महाविद्यालयांना नफा कमविण्यासंबंधी घातलेले निर्बंध काढण्यात आले असल्याने शासनाने सदर कंपनीद्वारे स्थापन वैद्यकीय महाविद्यालयास कायदयातील 'खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्था' या व्याख्येतून वगळले आहे. तसेच, या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील कुमारी मातांचे मानधन वाढविण्याबाबत.**

**(२०) १०५२३६ (०४-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील ५३ कुमारी मातांना शासनाकडून एक अपत्य असल्यास ५ हजार १०० व दोन अपत्य असल्यास दुप्पट रक्कम वर्षभरासाठी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, कुमारी मातांचे मानधन वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दि. ०९.१०.२०१३ च्या "सुधारित बाल संगोपन योजनेच्या" शासन निर्णयानुसार यवतमाळ जिल्हयातील कुमारी मातांच्या अपत्याला प्रतिमाह/प्रतिलाभार्थी रु.४२५/- प्रमाणे, वार्षिक रु.५१००/-इतके अनुदान देण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बालगृहे व त्यामध्ये असणाऱ्या बालकांची आकडेवारी संदर्भात चूकीची माहिती सादर केल्याबाबत**

**(२१) १०५२४८ (०४-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७५० बालगृहात १४ हजार बालके असतांना शासनाच्या आकडेवाडीत ११०५ संस्थातील बालगृहांमध्ये ९१,३४४ बालके असल्याची चूकीची माहिती लोकप्रतिनिधींना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच राज्यात एकुण किती बालगृहे चालविणा-या संस्था कार्यरत आहेत,

(३) असल्यास, यामध्ये शासकीय व स्वयंसेवी किती संस्था आहेत व त्यामध्ये किती अनाथ, निराधार आणि काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना प्रवेश देण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, राज्यातील बालगृहांत किती बालके आहेत याबाबत खोटी माहिती देण्यासंदर्भात चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) व (२) महिला व बाल विकास विभागातंर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या व विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी शासकीस संस्था ४३ (२५ बालगृहे, ६ अनुरक्षणगृहे व १२ निरीक्षणगृहे)व स्वंयसेवी संस्था १०६२(९९४ बालगृहे, ४८ निरिक्षणगृहे, १७ शिशुगृहे, ३ अनुरक्षणगृहे) असे एकूण ११०५ संस्था व त्यांची मंजुर क्षमता ९१३४४ इतकी होती.

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.बालगृ-२०१५/प्र.क्र.५०/का-८ दि.२७.१०.२०१७ अन्वये २१४ बालगृहांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सद्य:स्थितीत राज्यात २५ शासकीय संस्था बालगृहे व ७८१ स्वंयसेवी संस्थांची बालगृहे आहेत.

(३) कार्यरत असलेल्या उपरोक्त बालगृहांमध्ये माहे डिसेंबर, २०१७ अखेर एकुण २०६८३ एवढ्या बालकांना बाल कल्याण समितीच्या आदेशांन्वये प्रवेश देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयामध्ये सामान्य रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२२) १०५२९७ (०७-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शासकीय वैद्यकीय रुग्णालयामध्ये सामान्य रुग्णांना अत्याधुनिक एमआरआय, सीटी स्कॅन चाचणी करिता आठ ते दहा दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याचे माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व अत्याधुनिक चाचण्या डिजिटल यंत्रणे मार्फत डॉक्टरांच्या संगणकावर प्रत्यक्ष पाहण्याच्या यंत्रणेत (ऑन लाईन) देखील बिघाड झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉक्टर संगणकावर डिजिटल यंत्रणेमार्फत चाचण्या पाहू न शकल्यामुळे रुग्णांचा अहवाल उशिरा मिळत असल्याने वैद्यकीय उपचारात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील आधुनिक चाचण्यांचे अहवाल त्वरित मिळण्याबाबतची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०७-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील एमआरआय व सीटी स्कॅन यंत्रावरील चाचण्यांच्या उपचारार्थ येणाऱ्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याने सदर यंत्रावर ७ ते ८ दिवसांची प्रतिक्षा यादी आहे. तथापि रुग्णालयातील अतिगंभीर व तातडीच्या उपचारार्थ आलेल्या रुग्णांच्या चाचण्या प्राधान्याने करण्यात येतात.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(२३) १०५५३५ (०७-०४-२०१८). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळात आर्थिक गैरव्यवहारा बरोबरच कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीतही घोटाळा झाल्याची बाब तसेच महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.परमेश्वर जकीकोरे यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.शरद बनसोड व अन्य काही व्यक्तींविरुध्द आर्थिक घोटाळयाची पुराव्यासह ३०० पानी तक्रार मुंबई पोलीसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे केल्याची बाब दिनांक ११ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास सादर केलेल्या महामंडळाच्या वार्षिक अहवालामध्ये श्रीमती माधुरी पद्मनाभ वैद्य यांना दिलेली पदोन्नती नियमबाहय असणे, श्री.राजेंद्र सॅम्यूअल कदम यांना दिलेली बेकायदेशीर पदोन्नती तसेच श्री.एस.आर.कुमरे, श्री.एच.जी.आत्राम इ.दिलेली बेकायदेशीर पदोन्नती, इत्यादी अनेक पदोन्नत्या या बेकायदेशीर असून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.रमेश बनसोड यांच्या कार्यपध्दतीबद्दल अहवालात नमूद करण्यात आलेल्या गंभीर बाबी, याची दखल शासनाने तातडीने घेऊन या सर्व गैरप्रकाराची चौकशी सुरु केली आहे काय,

(३) तसेच वंसतराव नाईक आर्थिक विकास महामंडळातील ३ कोटी ६८ लाख ९० हजार आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी हिंगोली व जालन्याचे जिल्हा व्यवस्थापक प्रेमासिंग राठोड यास नांदेड येथे दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महामंडळात सहा प्रादेशिक व्यवस्थापक आणि दोन व्यवस्थापक अशी आठ पदे मंजुर असतांना १३ प्रादेशिक व्यवस्थापक नेमण्यात आले या पदोन्नतींना महामंडळाच्या संचालक मंडळाची वा शासनाची मान्यता घेण्यात आलेली नसतांना वा सक्षम प्राधिका-याकडून बिंदूनामावली तपासून घेण्यात आलेली नाही,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१६-०७-२०१८) :** (१) होय.

(२) होय, श्रीमती माधुरी पद्मनाथ वैद्य, श्री. राजेद्र सॅम्युअल कदम, श्री.एस.आर.कुमरे व श्री.एच.जी.आत्राम यांच्या पदोन्नत्या या विहित प्रक्रियेनुसार देण्यात आल्या नाहीत, म्हणून संचालक मंडळाच्या दि.०३.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत सदर पदोन्नत्या रद्द करण्यात आल्या होत्या.सदर पदोन्नत्या आता रद्द करण्यात आल्या आहेत.

(३) होय.

(४) व (५) महांमडळात प्रादेशिक व्यवस्थापक पदावर कार्यरत असलेल्या १३ पंदापैकी ४ पदावरील पदोन्नत्या हया विहित प्रक्रिया न करता, बिंदु नामावली न तपासता व संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली नसल्याने दि.०३.०२.२०१८ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहेत, तसेच २ अधिकारी सेवानिवृत्त झाले असून, १ अधिका-यांचा अतिरिक्त कार्यभार कमी करण्यात आला आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

**राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षा (नीट) परीक्षेच्या गैरव्यवस्थापनामुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान**

**(२४) १०५६४३ (०७-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षणातील पदव्युत्तर पदवी शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या काही विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षा (नीट) देण्यासाठी पाच मिनिटे उशीर झाल्याने परीक्षेस बसण्यास मज्जाव करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या गैरव्यवस्थापनाचा फटका बसलेल्या मुंबईसह इतर राज्यातील विद्यार्थ्यांनी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांची भेट घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील संबंधितांवर कारवाई न झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा विद्यार्थ्यांनी निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ‘नीट’ परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१८) :** (१) अशी बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही. नीट-पीजी परीक्षा ही राज्यशासनाकडून आयोजित करण्यात येत नसून ती केंद्रशासनातर्फे राष्ट्रीय परीक्षा बोर्ड (NBE) मार्फत घेण्यात येते.

(२) शासनाच्या असे निदर्शनास आले नाही.

(३) शासनाच्या असे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात “बेटी बचाव बेटी पढाओ” या योजनेमध्ये होत असलेला गैरप्रकार**

**(२५) १०६६२० (०४-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) “बेटी बचाव बेटी पढाओ” या योजनेच्या ग्राहकनोंदणी फॉर्म भरण्यासाठी प्रत्येक जिल्हयातील डाक कार्यालयात या योजनेतुन दोन लाख रुपये दिले जाणार होते परंतु सदर योजना अस्तित्वात नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अमरावती शहरात तसेच जिल्ह्यात बऱ्याच झेरॉक्स सेंटरवरुन या बनावट योजनेच्या नावावर शेकडो बनावट अर्जाची विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा बनावट योजनेच्या नावाखाली होणारी फसवणूक थांबण्यासाठी शासनाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

"बेटी बचाव बेटी पढाओ" या योजनेअंतर्गत कोणत्याही लाभार्थ्यांस निधी दिला जात नाही.

(२) होय, हे खरे आहे.

अमरावती शहरात तसेच अचलपूर, अंजनगाव तालुक्यात अर्जाची विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले होते.

(३) महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी वृत्तपत्रातून या योजनेसंबंधिताच्या अफवावर नागरीकांनी विश्वास ठेवू नये असे आवाहन केले होते. तसेच याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, अमरावती यांनी एका झेरॉक्स सेंटर विरोधात पोलीस स्टेशन अमरावती येथे FIR दाखल केली आहे. त्याचप्रमाणे तालुक्यात अर्जाची विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आल्या होत्या. तसेच सर्व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांनी त्यांच्या प्रकल्प अंतर्गत या संबंधित जनजागृती करावी असेही निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या पश्चिम भागातील गावांमध्ये गव्याचा वाढता वावर**

**(२६) १०७४२६ (३१-०३-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या पश्चिम भागात केळोशी खुर्द, आपटाळ,केळोशी बुद्रुक, म्हासुर्ली, धनगरवाडे, कोनोली, पाटीलवाडी या गावांसह अनेक वाडयावस्त्यामध्ये गव्यांचा वावर वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळशी खुर्द पैंकी मोहितेवाडी येथील शेतकऱ्यावर गव्याने हल्ला केल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून गव्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला शासनाने आर्थिक मदत केली आहे काय,
(३) असल्यास, मयत शेतकऱ्याच्या वारसाना तात्काळ अर्थसहाय्य देण्यासह गावांतील लोकांचे गव्यापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१८-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

दि. ११.०९.२०१७ रोजी कोळोशी खुर्द पैकी मोहितवाडी येथील श्री.मधुकर दौलु मोहिते यांचा गव्याच्या हल्ल्यात मृत्यु झाला आहे. मृत व्यक्तीच्या वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.८.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

(३) गावांतील लोकांचे वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे -

• वन्यप्राण्यांपासून लोकांचे संरक्षण करण्याकरिता गस्ती पथक तयार करण्यात आले असून त्यांच्यामार्फत वन्यप्राण्यांना त्यांच्या अधिवासात पाठविण्याची कार्यवाही करण्यात येते.

• वन्यप्राणी यांचे अधिवास क्षेत्रात पाणी उपलब्ध व्हावे याकरिता सन २०१७-१८ मध्ये राधानगरी वन परिक्षत्रात २० वनतळे खोदण्यात आले आहे.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

• परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यानी ग्रामीण भागात सेवा करणेबाबत**

**(२७) १०७५७५ (०४-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यासाठी ग्रामीण भागात सेवा करण्याचे बंधन करण्यात आले असून त्याच अनुषंगाने शासनाकडून शिष्यवृत्ती किंवा शुल्क सवलत घेणाऱ्या खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही ग्रामीण भागात काम करणे बंधनकारक करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ रोजीच्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधपत्रित सेवेची अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती किंवा शुल्क व्याजासह वसूल करण्यात येणार आहे मात्र जे विद्यार्थी सवलत घेणार नाहीत त्यांना बंधपत्र

द्यावे लागणार नाही हा निर्णय येत्या शैक्षणिक वर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाब शासन पुढे कोणती उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०५ जानेवारी,२०१८ च्या शासन निर्णयान्वये बंधपत्रित सेवा करणे आवश्यक असलेल्या उमेदवारांनी जर त्यांना वाटप करण्यात आल्यानुसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात कसूर केल्यास संबंधित उमेदवारांना शासनाकडून शिष्यवृत्ती/प्रतिपूर्ती स्वरुपात प्राप्त शुल्काची रक्कम ही व्याजासह शासनास परत करणे आवश्यक राहील. या व्यतिरिक्त बंधपत्रित सेवेबाबत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ज्या अटी/शर्ती लागू आहेत, त्या अटी/शर्ती उमेदवारांना सुध्दा लागू होतील अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे अशा संस्थेमधील कोणत्याही प्रकारची सवलत न घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बंधपत्र लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) जनतेने कर स्वरुपात भरलेल्या पैशातून उमेदवाराच्या शिष्यवृत्ती/प्रतिपूर्तीचा खर्च शासनाकडून करण्यात येत असतो. त्यामुळे बंधपत्रित सेवा करुन सामाजिक बांधिलकी म्हणून खर्चाची परतफेड करत असल्याने नाराजीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील टी पॉईंट परिसरातील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक माहिती निवास आरक्षण केंद्र बंद असल्याबाबत

**(२८) १०७८४० (०७-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील जगप्रसिध्द असलेले अजिंठा लेणी पाहण्यासाठी देश-विदेशातून मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात मात्र टी पॉईंट परिसरात असलेले महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक माहिती निवास आरक्षण केंद्र मागील एक वर्षापासून बंद असल्यामुळे पर्यटनांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, सदरहू बंद असलेले आरक्षण केंद्र त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०७-२०१८) :** (१), (२) व (३) दि.१/१०/२०१७ पासून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक माहिती केंद्र अजिंठा टी पॉईंट परिसरात सुरु करण्यात आले आहे.

---

**राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबवित असलेली "माझी कन्या भाग्यश्री" या योजनेबाबत**

**(२९) १०८९९३ (०४-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे "माझी कन्या भाग्यश्री" ही योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवीन योजनेच्या निकषानुसार, "१ ऑगस्ट, २०१७ ला किंवा त्यानंतर जन्मलेली मुलगी असावी" तसेच जुन्या सुकन्या योजनेच्या निकषानुसार पूर्वी प्रस्ताव सादर केले असले तरी त्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट, पूर्वी जन्मलेल्या मुलीला भाग्यश्री योजनेत समाविष्ट करण्यात येणार नाही, हा निकष नवीन योजनेत समाविष्ट करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उक्त योजनेअंतर्गत अटी व शर्तीनुसार दिनांक १ एप्रिल, २०१६ ते डिसेंबर, २०१७ अखेर किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक ०१ जानेवारी, २०१४ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीत सुकन्या योजना कार्यान्वित होती. सुकन्या योजनेचा लाभ दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना अनुज्ञेय आहे. जुनी माझी कन्या भाग्यश्री ही योजना दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना तसेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख

आहे अशा लाभार्थ्यांना अनुज्ञेय होती. सदर योजना दिनांक १ एप्रिल, २०१६ ते ३१ जुलै, २०१७ या कालावधीत कार्यान्वित होती. सदर कालावधीत संबंधित लाभार्थ्यांने अर्ज केला असेल तर त्यास या योजनेचा लाभ देय राहील. मात्र दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून सुधारित माझी कन्या भाग्यश्री योजनेमध्ये नमूद असलेले लाभ मंजूर करण्यात येणार आहेत.
(३), (४) व (५) दिनांक ०१/०४/२०१६ ते २८/०२/२०१७ अखेर एकूण ३३९९ लाभार्थी योजनेचा लाभ मिळण्यास पात्र झालेले असून त्यांना बँकेमार्फत योजनेचा लाभ देण्यासाठी दिनांक २०/०३/२०१८ च्या शासन निर्णयानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

**नांदेड जिल्हयातील पळसा येथील दोन अंगणवाड्या वापराविना पडुन असल्याबाबत**

**(३०) १०९१७७ (०७-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील पळसा येथे तेरावा वित्त आयोगातंर्गत सन २०१३-१४ मध्ये दोन अंगणवाडी खोल्याचे बांधकाम पुर्ण करण्यात आले हे काम ग्रामपंचायतीने गुत्तेदारांमार्फत करुन घेतले हे काम गुत्तेदारांने थातुरमातूर काम करुन ना-दारे बसविले ना-खिडक्या, छतही गळायला लागले व सर्व भिंतीला तडे गेल्याने या दोन्ही अंगणवाडया अदयापही वापरात नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हदगांव तालुक्यातील पळसा हे गांव नागपूर महामार्गावर असुन या गावाची लोकसंख्या १२ हजाराच्यावर असुन तेथे एकुण पाच अंगणवाडया असुन ५०० हुन अधिक विदयार्थी अंगणवाडयात शिक्षण घेत आहेत परंतू मात्र पळसा येथील अंगणवाडीमध्ये बसण्यासाठी अंगणवाडीच नसल्याने चिमुकले विदयार्थी उघडयावर शिक्षण घेत आहे तरी याबाबत शासन चौकशी करुन आवश्यक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सन २०१२-२०१३ या वर्षात १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत अंगणवाडी क्रमांक ३ आणि ५ ला अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे मंजूर करण्यात आली. निधी उपलब्ध करुन ग्रामपंचायतीमार्फत बांधकामे पूर्ण करण्यात आले. परंतु संबंधित ग्रामपंचायतीने दोन्ही अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत पुर्ण केले नाही व त्या अंगणवाडी केंद्र इमारतीचा ताबा दिलेला नाही याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव चौकशी करीत आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे पळसा ता. हदगांव, जि.नांदेड येथे एकूण ५ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. अंगणवाडी केंद्र क्रमांक १,२,४, ला स्वतंत्र इमारती आहेत. अंगणवाडी केंद्र क्रमांक २ च्या

इमारतीत अंगणवाडी केंद्र क्रमांक २ व ३ एकत्र भरविण्यात येतात व अंगणवाडी केंद्र क्रमांक ४ च्य इमारतीत अंगणवाडी केंद्र क्रमांक ४ व ५ एकत्र भरविण्यात येतात. अंगणवाडीतील बालके उघडयावर शिक्षण घेत नाहीत.

---

**राज्यात अनाथ गृहे चालविणा-या विविध खाजगी संस्थांना मिळणारे अनुदान थकीत असल्याबाबत**

**(३१) १०९२२९ (०४-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनाथ गृहे चालविणा-या विविध खाजगी संस्थांना गत ४ वर्षापासून ते अद्यापपर्यंत प्रत्येक बालकास १२२० रुपये अनुदान याप्रमाणे, लाखो रुपये थकित अनुदानाची रक्कम शासनाने अनाथगृह व्यवस्थापनास उपलब्ध करुन दिली नसल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारासनिदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त खासगी संस्थांचे अनुदान रक्कम गेले ४ वर्षापासून थकित ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त संस्थांची थकित अनुदान रक्कम तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०११ /प्र.क्र.४१८/का-८, दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ अन्वये सर्वसाधारण बालगृहांना दरमहा दरडोई रूपये १२१५/- प्रमाणे परिपोषणासाठी तरतूद उपलब्ध करण्यात येते.

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सन २०१०-११ पासून २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी राज्यातील ९६३ स्वंयसेवी संस्थांच्या बालगृहांच्या पुनर्मुल्यनिर्धारण अहवालानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

मात्र सन २०१५-१६ ते सन २०१७-१८ अखेर प्राप्त निधी वेळोवेळी आयुक्त, म.व बा.वि.आ.पुणे यांनी वितरीत करण्यात आला असून संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मागणीनुसार संस्थांना संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील अंगणवाडीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) १०९९१९ (०७-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील १२०४ गावांत ३३५६ अंगणवाडया कार्यरत असून त्या अंगणवाडयांमध्ये ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पुरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखणे तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयातील ३३५६ अंगणवाडयापैकी २४२५ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून ८०० अंगणवाडया या भाड्याच्या जागेत सुरु असून तेथे त्यांना शौचालय, स्वतंत्र स्वयंपाकघर आरोग्य इ.सोयी सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८०० अंगणवाडयाच्या बांधकामासाठी रुपये ४८ कोटीचा निधीचा प्रस्ताव आयुक्त एकात्मिक बालविकास यांचेकडे पाठविण्यात आला असून त्यावर अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अंगणवाडयांना आवश्यक त्या सोईसुविधा व बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

औरंगाबाद जिल्हयात एकूण ३५०६ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. ३५०६ अंगणवाडयांमध्ये ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहार देऊन कुपोषण रोखण्याचा तसेच गर्भवती माता व किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन मिळण्याच्या दृष्टीने अंगणवाडया कार्यरत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हयात ३५०६ अंगणवाडयापैकी २४५२ अंगणवाडयांना स्वत:च्या इमारती असून २५० अंगणवाडया बांधण्यासाठी सरकारी जागा उपलब्ध होत नसल्याने भाडयाच्या जागेवर चालविल्या जात असून उर्वरित अंगणवाडी केंद्र शेजारची जिल्हा परिषद शाळेच्या खोली, समाजमंदिर, ग्रामपंचायत, इत्यादी ठिकाणी भरविण्यात येतात त्या ठिकाणी शौचालय व आरोग्य सुविधा पुरविल्या जातात.

(३) शासकीय जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी अंगणवाडी इमारत बांधकामासाठी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम घेण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनास सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत प्राप्त होणाऱ्या तरतूदीमधून अंगणवाडी केंद्र इमारत दुरुस्तीची कामे घेण्याबाबत शासनाने दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार धोरण निश्चित केलेले आहे.

(४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून ५०% नविन अंगणवाडी बांधकामासाठी व जुन्या अंगणवाडीत किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयामध्ये व अंगणवाड्यांमध्ये रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(३३) १०९९६९ (०४-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील अतिदुर्गम आदिवासी भागात २४ महसुली गावे या प्रकल्पात येत असून या कार्यक्षेत्रात २६ मिनी अंगणवाड्या आणि ११३ मुळ अंगणवाड्या असून त्या ठिकाणी एकात्मिक बालविकास प्रकल्प सुरू करण्यात आले असून तेथे रिक्त असलेल्या पदांमुळे दोन मुख्य सेविकांना १३९ अंगणवाड्यांच्या कामाची माहिती त्यांना घ्यावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एकात्मिक बालविकास वाडा प्रकल्प कार्यालयात व तेथील १३९ अंगणवाडी कार्यालयात रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याबाबतची मागणी समर्थन संस्थेने मा.महिला व बालविकास मंत्री, सचिव, महिला व बालविकास यांच्याकडे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कधीपर्यंत सदर रिक्त पदे भरण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मुख्य सेविकेची पदे जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्यात येतात. राज्यात कार्यरत असलेल्या अंगणवाडया गावातील जवळच्या अंगणवाडयांमध्ये समाविष्ट करता येतील काय, याबाबत आढावा घेण्याचे कामकाज वित्त विभागाच्या सूचनेनुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई कार्यालयामार्फत सुरु आहे. आढाव्या अंती रिक्त पदे भरण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर मुख्य वनसंरक्षक कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील वनविभागामध्ये खड्डे खोदाईच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(३४) ११०२०७ (१०-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर मुख्य वनसंरक्षक कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील वनविभागामध्ये खड्डे खोदाईच्या कामात अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार झालेला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर गंभीर प्रकरणी त्रयस्थ समिती स्थापन करुन चौकशी करण्याची मागणी मा.वनेमंत्री, मुख्यवनसंरक्षक, कोल्हापूर यांचेकडे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वारंवार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१८) :** (१) कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यातील वृक्ष लावगडीसंदर्भात दि. ८ व ९ डिसेंबर, २०१७ रोजी " झी चोवीस तास" या मराठी वृत्तवाहिनीवर बातम्या प्रसारित झालेल्या होत्या.

(२) हे खरे नाही. तथापि वृत्तवाहिनी वरील बातम्यांच्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक ( मुख्यालय) सामाजिक वनीकरण, पुणे यांनी दि. २८ व दि. २९ डिसेंबर, २०१७ रोजी तक्रारीमध्ये नमूद रोपवन कामांना भेटी देऊन वस्तूस्थितीची पाहणी केली आहे.

(३) व (४) प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधीत वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अंगणवाडी शाळेच्या सेविका व मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्याबाबत**

**(३५) ११०४४२ (१०-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील अंगणवाडी शाळेच्या सेविका व मदतनीस यांनी पगारवाढीबरोबर अन्य मागण्याकरिता माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आंदोलनामुळे शिरोळ तालुक्यातील २२० अंगणवाडया बंद असल्यामुळे सुमारे १४ हजार विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अंगणवाडी सेविकांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) अंगणवाडी शाळेच्या सेविका व मदतनीस यांनी पगारवाढीबरोबर अन्य मागण्याकरीता दिनांक ११/०९/२०१७ ते ०८/१०/२०१७ या कालावधीत काम बंद आंदोलन केले होते.
(२) होय, हे खरे आहे.
शिरोळ तालुक्यात प्रकल्प १ व २ अंगणवाडी शाळेच्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे सपंकाळात एकूण ४९८ अंगणवाडी बंद होत्या. त्यामुळे बंद कालावधीत अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित नसल्याने बालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण देता आले नाही.
(३) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मानधनात वाढ म्हणून अंगणवाडी सेविका रु.१५००/, मिनी अंगणवाडी सेविका रु.१२५०/- व मदतनीस रु.१०००/- प्रमाणे वाढ करणेबाबत घोषणा केली आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३/०२/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ, हातकणंगले आणि कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काही भागात पाण्याच्या अतिवापरामुळे क्षारपड जमिनीच्या क्षेत्रात वाढ झाल्याबाबत**

**(३६) ११०४८२ (०४-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ, हातकणंगले आणि कागल (जि.कोल्हापूर) तालुक्यातील काही भागात पाण्याच्या अतिवापरामुळे क्षारपड जमिनीच्या क्षेत्रात वाढ झाली असून शिरोळ तालुक्यातील काही शेतकऱ्यांच्या जमिनी कोणत्याही कामासाठी उपयोगाच्या नसल्याचा निष्कर्ष मृदसंधारण विभागाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निष्कर्षानुसार या विभागाने कोणकोणत्या उपाययोजना सुचविल्या आहेत,
(३) असल्यास, या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (२७-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, कोल्हापूर यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत शिरोळ तालुक्यातील क्षारपड जमीन सुधारणा करणेसाठी बंदीस्त निचरा प्रणालीद्वारे उपाययोजना सुचविल्या आहेत.

(३) अद्याप नाही.

---

**सातारा जिल्हयात कृषि विभागाकडील जलयुक्त शिवारचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३७) ११०४८७ (१०-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात कृषि विभागाकडील जलयुक्त शिवारासह इतर कामांची चौकशी सुरु असल्याने गेल्या वर्षभरात कृषि विभागाला पाणलोटच्या कामासाठी मिळालेल्या रु. २० कोटी निधीपैकी १८ कोटी रुपये अखर्चित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अखर्चित राहिलेला निधी जिल्हयातील विविध गावाच्या पाणीपुरवठा योजनांसाठी खर्च करण्यात येणार आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार व पाणलोटची कोणकोणती कामे पूर्ण न झाल्यामुळे रक्कम अखर्चित राहिली, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

सातारा जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये निवडलेल्या २१० गावांत कृषी विभागाद्वारे २१२९ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर कामे पूर्ण करण्यासाठी विशेष निधी अंतर्गत २२.९५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यानूसार माहे मार्च, २०१८ अखेर संपूर्ण निधी खर्च झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनामार्फत होणाऱ्या बालगृहाच्या तपासणीमध्ये सोलापूर जिल्हयातील बालगृहांचा समावेश करण्यात आल्याबाबत**

**(३८) ११०५१२ (०४-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालगृहांचे सुधारित धोरण तयार करण्यासाठी जवळपास ९६३ सह सोलापूर जिल्हयातील ८८ बालगृहांचे सन २०१५ मध्ये मा.महिला व बालविकास मंत्री यांच्या आदेशानूसार हाय इन्पेक्शन करण्यात आले होते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील ८८ पैकी २४ बालगृहांचा समावेश करण्यात आल्याने संस्थाचालकांसमोर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन संस्था चालकांची समस्या दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) व (२) शासन निर्णय क्र. बालगृ-२०१५/ प्र.क्र. ५०/ का-८/ मुंबई दिनांक १३ जुलै २०१५ अन्वये संपुर्ण महाराष्ट्रातील स्वंयसेवी संस्थांच्या बालगृहांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्हयातील संस्थाचा समावेश आहे. तसेच तपासणी करण्यापुर्वी सर्व बालगृहांना तपासणी बाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत कळविण्यात येवून त्यानंतरच तपासणी करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावली (जि.चंद्रपूर) तालुकयातील वन्यप्राणांच्या हल्ल्यात जखमी व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३९) ११०८४८ (३१-०३-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील चांदली बुज येथील धोंडू पोचू गोलावार यांचेवर सावली वनपरिक्षेत्रात दिनांक २२ मे, २०१६ रोजी रानडुकराने हल्ला करून गंभीर जखमी केले असता त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असे असतांना सुध्दा गेल्या दिड वर्षापासून वन विभागाकडून अद्यापही मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झाल्यामुळे आर्थीक नुकसान भरपाई मिळण्याबाबत धोंडू पोचू गोलावार यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी सावली यांच्याकडे माहे मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) चंद्रपूर वन विभागातील श्री. धोंडू पोचू गोलावार यांचे प्रकरणासोबत वैद्यकीय प्रमाणपत्र नसल्याने ते गंभीर जखमी होते किंवा नाही याबाबत निश्चिती नाही. संबंधित शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत नसल्याने नुकसान भरपाई देण्यात आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्हयातील अंगणवाड्यांमधील गैरसोयीबाबत

**(४०) १११०६३ (०४-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात अंगणवाड्यांच्या तपासणी दरम्यान २५० ते ३०० अंगणवाड्यांना पिण्याचे पाणी, शौचालय सारख्या मुलभूत सुविधाच उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, १०० ते १५० अंगणवाडी इमारतींना छप्परच नसल्याने विद्यार्थ्यांना उघड्यावरच शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले

(४) असल्यास, अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा, इमारत पुरविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सदर अंगणवाडीतील विद्यार्थी व अंगणवाडी सेविका यांना पिण्याचे पाण्यासाठी अथवा शौचालयाचे समस्यांना सामोरे जावे लागत आहे अशी परिस्थिती नाही. जिल्हयातील सर्व अंगणवाडी केंद्रावर पिण्याचे पाण्याची व्यवस्था आहे. अंगणवाडी केंद्रावर शौचालयाची सुविधा पर्यायी मार्गाने उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ पासून जिल्हा वार्षिक योजनेमधून ५०% नविन अंगणवाडी बांधकामासाठी व जुन्या अंगणवाडीत किरकोळ दुरुस्तीसाठी तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधीचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे शिंदाळवाडी (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलाव कामास मंजुरी देण्याबाबत

**(४१) १११३८ (०४-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिंदाळ वाडी (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलावाच्या कामास मंजुरी देण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण मंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर पाझर तलावाचा प्रस्ताव मान्यतेसाठी तात्काळ सादर करण्याचे

आदेश मा.अधीक्षक अभियंता जलसंधारण विभाग औरंगाबाद यांना दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी किती खर्च येत असून सदरचा प्रस्ताव सादर करुन मंजुरीसह विलंबाची चौकशी करून संबधित दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२७-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रस्तावित पाझर तलावाचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पुर्ण करण्यात आले असून सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रकानुसार रु.३८४.३७ लक्ष एवढा खर्च आहे. तथापि सदर तलाव प्रचलित आर्थिक मापदंडात बसत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील वन विभागाच्या वनरक्षकांना जंगलाची सुरक्षा करण्यासाठी शस्त्रांचा पुरवठा करण्याबाबत**

**(४२) १११७२० (१०-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील वन विभागाचे वनरक्षक शस्त्राविनाच जंगलाची सुरक्षा करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही महिन्यापूर्वीच येथील नर्सरीत दरोडा पडून रक्तचंदनाची लाकडे पळविली गेली त्यावेळी वनरक्षकांकडे शस्त्र नसल्याने ते प्रतिकार करु शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वनरक्षकांना आवश्यक त्या शस्त्रांचा पुरवठा केव्हा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१८) :** (१) व (२) कोल्हापूर वन विभागामध्ये करवीर वनपरिक्षेत्रात मौजे चिखली मध्यवर्ती रोपवाटीका आहे. मौजे चिखली येथे कोणतेही वनक्षेत्र येत नाही. सदर रोपवाटीकेमध्ये १ वनरक्षक व २ वनमजूर कार्यरत असून वनमजूर यांना शस्त्रपुरवठा अनुज्ञेय नाही. दिनांक १८.७.२०१७ रोजी रात्रपाळीस २ वनमजूर कार्यरत असताना पहाटे १.०० ते ३.०० वाजता या कालावधीत १० ते १२ शस्त्रधारी अज्ञात व्यक्तींनी चिखली रोपवाटीकेत जाऊन रात्रपाळी करीता असणाऱ्या वनमजूरांना शस्त्राचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देऊन व मारहाण करुन त्यांना दोरखंडाने बांधून ठेवले व रोपवाटीकेमध्ये गुन्हे कामातील जप्त मुद्देमाल ठेवलेल्या बंदिस्त गोडावूनचे खोलीचे कुलूप तोडून तसेच खोली मधील बंद पिंजऱ्याचे कुलूप तोडून त्यातील जप्त मुद्देमालामधील चंदन तेलाचे ४ डबे एकूण १०० कि.ग्रॅ., चंदन चुरा ५ पोती व त्याचबरोबर बंदीस्त जप्त वाहनातील रक्तचंदन माल ५.०० टन चोरुन अज्ञात वाहनातून घेऊन गेले.

(३) व (४) कोल्हापूर वनविभागातील वनपाल/वनरक्षक यांना जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील प्रशिक्षकामार्फत शस्त्रहाताळणी चे प्रशिक्षण देऊन वनपाल/वनरक्षक यांच्यासाठी SLR रायफल व SLR रायफलीचा दारुगोळा पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मौजे आळते व मौजे घोसरवाड (जि.कोल्हापूर) येथील करवीर वनक्षेत्रपाल यांच्या परिक्षेत्रास केलेली वृक्ष लागवड पाण्याअभावी अयशस्वी झाल्याबाबत**

**(४३) १११७४० (३१-०३-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आळते व मौजे घोसरवाड (जि.कोल्हापूर) येथील करवीर वनक्षेत्रपाल यांच्या परिक्षेत्रास केलेली वृक्ष लागवड पाण्याअभावी अयशस्वी झाली असून जुन्याच खड्डयात दिनांक ११ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास पुन्हा वृक्ष लागवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (मुख्यालय) सामाजिक वनीकरण, पुणे यांनी दि. २८ व दि. २९ डिसेंबर, २०१७ रोजी तक्रारीमध्ये नमूद रोपवन कामांना भेटी देऊन वस्तूस्थितीची पाहणी केली असता कामामध्ये वित्तीय व प्रशासकीय अनियमितता आढळून आलेली आहे.

(३) व (४) प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या संबंधीत वनक्षेत्रपाल, वनपाल व वनरक्षक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

---

**सरकारी वन जमिनीच्या बाबत झुडपी जंगलाच्या धर्तीवर शेतकऱ्यांना (जमीन कसणाऱ्या) जमिनी देण्याबाबत समिती गठीत करण्याबाबत**

**(४४) १११९९६ (३१-०३-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील झुडपी जंगलाच्या शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनी व वन खात्यास कार्य आयोगानुसार वनसंवर्धन करणे शक्य नाही, अश्या छोट्या तुकड्यामध्ये विभागलेल्या जमिनी शासनाने धोरण स्वीकारत केंद्र शासन परवानगीनुसार प्रत्यक्ष जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्याला जमिनी कायमस्वरूपी देण्याचा धोरणात्मक निर्णय केंद्र शासनाच्या संमतीने घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) खाजगी वन अधिनियम १९७५ नुसार ३५/१ व ३५/३ नुसार नोटिसा दिलेल्या जमिनी संपादन करण्याचा निर्णय घेण्यात आला तथापी अद्यापपर्यंत या जमिनीच्या संपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही अशा कार्यवाही पूर्ण न झालेल्या जमीनी शेतकऱ्यांना परत देण्याचा निर्णय गोदरेज अँड बॉईज प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) यासंबधी विदर्भाप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्राला देखील झुडपी जंगलाचा नियम लावून शेतकऱ्यांना जमिनी परत देण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी माहे जुलै, २०१७ व माहे डिसेंबरमध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत समिती स्थापन करण्याची विनंती देखील लोकप्रतीनिधिनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त समिती स्थापन करणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०६-२०१८) :** (१) केंद्र शासनाने दिनांक ४.३.२०१४ च्या पत्रान्वये वन व्यवस्थापनाचे दृष्टीने अयोग्य असलेल्या क्षेत्रापैकी ३ हे.आर पेक्षा कमी, अतिक्रमणाखालील किंवा वनेत्तर वापराखाली असलेले अनुक्रमे ३२२२९.८१ हे., २७५०७.३४ हे., २६६७२.१७ हे. साठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० खाली वळतीकरणाबाबत प्रस्ताव सादर होण्यासाठी सुलभ कार्यपद्धती (Simplified Procedure) विनिर्दीष्ट केली आहे. तथापि, जमीनचा वैधानिक दर्जा कायम राहणार असून दिलेले प्रयोजनासाठीच क्षेत्र वापरावयाचे आहे, जर जमिनीचे दर्जात बदल करावयाचा असेल तर सर्वोच्च न्यायालयाची मंजूरी घ्यावी लागेल.
(२), (३), (४), (५) व (६) ज्या प्रकरणात खाजगी वने अधिनियमातील कलम २(एफ)(तीन) खाली संपादित झाले आहे अशा प्रकरणात केवळ ३५(३) ची नोटीस दिल्यामुळे संबंधित क्षेत्र खाजगी वन ठरत नसून त्यासाठी अशी नोटीस दिल्यानंतर नोटीस संबंधितांस तामील होणे इ. कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच नोटीस वरील कार्यवाही ठराविक कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे असे मा.सर्वोच्च न्यायालयाने खाजगी वनासंदर्भात दिनांक ३०.०१.२०१४ रोजी च्या निर्णयात नमूद वादींच्या बाबतीत स्पष्ट केले आहे सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आदेशात नमूद १९ याचिकाकर्त्यासंदर्भात प्रकरणनिहाय आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या दिनांक १२.१२.२०१४ च्या पत्रान्वये संबंधित प्राधिकरणास सूचना देण्यात आल्या आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचा सदर निर्णय इतरांना लागू करण्यासंदर्भात राज्यातील खाजगी वनांसंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट करुन त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

विधी व न्याय विभागाने राज्यातील खाजगी वनांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी त्याबाबत केंद्र शासनाचे अभिमत (concurrence) घेणे अनिवार्य असल्याबाबत कळविले आहे. सबब, मंत्रीमंडळ टिप्पणी मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यापूर्वी धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या शासन परिपत्रक व शासन निर्णयाचे प्रारुप शासनाच्या दिनांक ४.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास पर्यावरण, वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालयाला पाठविण्यात आले असून केंद्र शासनाचे अभिमत अद्याप अप्राप्त आहे.

---

## जालना जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांबाबत

**(४५) ११२२२७ (०४-०४-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत किती कामे हाती घेण्यात आली,

(२) असल्यास, त्यापैकी जलयुक्त शिवार योजनेची किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्हयात किती हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) ते (४) जालना जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये एकूण ४६८० कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी ४६५० कामे पूर्ण करण्यात आली असून ३० कामे प्रगतीत आहेत. सदर कामांवर रू.८०.४६ कोटी खर्च झाला असून या कामांमुळे ८७१४४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

तसेच सन २०१७-१८ मध्ये एकूण २५४६ कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी १०१४ कामे पूर्ण करण्यात आली असून १०७५ कामे प्रगतीत आहेत. सदर कामांवर रू.७.३९ कोटी खर्च झाला असून या कामांमुळे २५१५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे

---

## भोकरदन (जि.जालना) तालुक्यात अवैधरित्या होत असलेली वृक्षतोड

**(४६) ११२२९२ (३१-०३-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यात अवैधरित्या वृक्षतोड व त्यांची सर्रास वाहतुक सुरु असून महसूल व वनविभागाचे अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्याचप्रमाणे जालना जिल्हयात कऱ्हाड बंदी असतांना वृक्षतोड करणा-या टोळया गावागावत फिरुन शेतकऱ्यांशी जवळीक करुन व पैशाचे आमिष दाखवून झाडे तोडली जात आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, चौकशीनूसार शासनाकडून दरवर्षी झाडे लावा, झाडे जगावा असा नारात देत वृक्ष लागवडीवर कोटयावधी रुपये खर्च केले जात असून दूसरीकडे मात्र प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे मोठया प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) अवैध वृक्षतोड व अवैध वाहतूक होऊ नये यासाठी अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वारंवार गस्त केली जाते. प्रशासनातील अधिकारी यामध्ये कोणताही हलगर्जीपणा करत नाहीत.

---

**मध्ये रेल्वेने पनवेल-वसई दरम्यान होणाऱ्या नविन रेल्वे मार्गाच्या बांधकामात बाधीत होणारी वृक्ष तोडण्यास दिलेली मंजूरी**

**(४७) ११२३१४ (३१-०३-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या डेडिकेटेड कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वतीने पनवेल-वसई दरम्यान मध्य रेल्वेच्या समांतर जड वाहतूकसाठी नविन रेल्वे मार्ग टाकण्याकरिता रेल्वे मार्गाच्या बांधकामात बाधित होणारी एकूण ७४७ झाडे तोडण्यास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची परवानगी देतांना सदरच्या झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ६.१.२०१३ चे पत्रान्वये केंद्र शासनाची तत्वत: मंजूरी प्राप्त झाली आहे. तत्वत: मंजूरीच्या पत्रातील अटींची पुर्तता प्रकल्प यंत्रणेकडून झाल्यानंतर प्रस्तुत प्रस्तावतंर्गत कामे करण्यास व झाडे तोडण्यास मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे पत्र दिनांक १.८.२०१५ अन्वये परवानगी प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावातंर्गत वनक्षेत्रातील झाडे तोडण्यात आली आहेत.

सदर प्रस्तावास केंद्र शासनाचे दिनांक १६.१२.२०१५ चे पत्रान्वये विधिवत मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावातंर्गत वनक्षेत्राच्या बदल्यात अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्याकरिता डहाणू वनविभागातील ११७ हेक्टर अवनत क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

---

**हिंगोली जिल्हयातील लोहगाव, उमरदरा, सवड व अन्य चार अशा सात गावातील पाझर तलावाची कामे अनेक वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४८) ११२५७७ (०४-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील लोहगाव, उमरदरा, सवड व अन्य चार अशा सात गावातील पाझर तलावाची कामे गेली अनेक वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावाच्या पाझर तलावाच्या कामावर शासनाने लाखो रुपयाचा निधी खर्च केला असून अद्यापही काम पूर्ण झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. रोहयो अंतर्गत सुरू केलेली पाझर तलावाची १६ कामापैकी ८ कामे अपूर्णावस्थेत आहेत हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. सदर योजनांवर १० टक्के पेक्षा कमी खर्च झाल्याने सदर कामे रोहयो मधून वगळण्यात आली आहेत.
(३), (४) व (५) जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सदर आठ अपूर्ण कामे जलयुक्त शिवार योजनेतून घेण्याच्या सूचना मा.पालकमंत्री यांनी दिल्या होत्या. त्यानूसार आठ पैकी तीन कामांना जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली असून प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आलेली आहेत. अपूर्ण कामे निधी उपलब्धततेनूसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

### औरंगाबाद येथील आरगिरण्या (सॉ मिल) बंद केल्याबाबत

**(४९) ११३५३६ (१०-०४-२०१८). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकूण ४००० पेक्षा जास्त आरगिरण्या (सॉ मिल) असून फक्त औरंगाबाद शहरात १०५ च्या सॉ मिल आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फक्त औरंगाबाद मधील आरगिरण्या (सॉ मिल) प्रदूषण विभागाची परवानगी नसल्याचे कारण देऊन बंद करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आरगिरण्या (सॉ मिल) बंद करण्यापूर्वी प्रदूषण विभागाकडून कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा पत्र व्यवहार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच कोणतीही मुदत न देता आरगिरण्या (सॉ मिल) बंद करण्यात आल्या असल्यास याबाबत चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०१८) :** (१) राज्यात ४००० पेक्षा जास्त आरागिरण्या असून औरंगाबाद शहरात एकूण ५५ आरागिरण्या आहेत.
(२) हे खरे आहे.

हवा प्रदुषण यंत्रणा न बसविल्यामुळे वेळोवेळी दिलेल्या नोटीसची पुर्तता न केल्यामुळे प्रदुषण नियंत्रण विभागाने औरंगाबाद मधील आरागिरण्या बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने विनासंमती पत्र असलेल्या आरागिरण्यांना बंदचे आदेश देण्यापूर्वी नोटीस दिलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेलू (जि.वर्धा) तालुक्यातील बोरधरण व केळझर येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत**

**(५०) ११४७३२ (०४-०४-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास विभागामार्फत सेलू (जि.वर्धा) तालुक्यातील बोरधरण व केळझर येथील पर्यटन स्थळचा विकास करण्याकरिता रुपये १० कोटी निधी मंजूर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमाचे भुमिपूजन मा.राज्यमंत्री, पर्यटन विकास यांचे हस्ते महिन्यापूर्वी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरधरण व केळझर येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-०७-२०१८) :** (१) दोन्हा पर्यटन स्थळांच्या विकास कामांसाठी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये रू.८८५.०१ लक्ष एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रू.११० लक्ष एवढा निधी जिल्हाधिकारी,वर्धा यांना वितरीत करण्यात आला आहे.

(२) सदर कार्यक्रमाचे भूमीपूजन दि.७/११/२०१७ रोजी करण्यात आले आहे.

(३) भाग(१)मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी मंजूर केला असून दोन्ही ठिकाणची कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.